Shri Shahu Chhatrapati Shikshan Sanstha's
Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur's

# SHAHAJI BULLETIN
## (शहाजी वार्तापत्र)

E-mail : sscm34.cl@unishivaji.ac.in • प्रेरणा : मा. श्री. मानसिंग बोंद्रे, चेअरमन, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था, मा. श्री. विजयराव बोंद्रे, मानद सचिव, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्था

• संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण • कार्यकारी संपादक : डॉ. सुरेश शिखरे • सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील • वर्ष दुसरे, अंक ८ वा (ऑक्टोबर / नोव्हेंबर / डिसेंबर २०१९)



## नव्या आव्हानांना सामोरे जाताना...

मित्रहो! 'शहाजी वार्ता'चा आठवा अंक आपल्या हाती देताना मनस्वी आनंद होत आहे. या अंकाबरोबर नव्या वर्षाला सुरूवात झाली असून, आगामी काळात खुणावणाऱ्या नवनव्या आव्हानांना सामोरे जाण्यासंदर्भात तयारी सुरू आहे. आपल्याला माहिती आहे की, मार्च २०२० मध्ये आपल्या महाविद्यालयाला प्राप्त झालेल्या नॅकच्या दुसऱ्या मूल्यांकनाची मुदत संपत आहे. तिसऱ्या मूल्यांकनाला सामोरे जात असताना नवा विचार, नवे आराखडे आणि सशक्त स्वरूपाची मांडणी या गोष्टींना कमालीचे महत्त्व येणार आहे. या दृष्टीने पुढील काही काळ विविध स्तरांवर आव्हानात्मक असणार आहे.

सरत्या वर्षाला निरोप देत असताना दोन गोष्टींचा विचार प्राधान्याने नजरेसमोर येतो. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या महाविद्यालयाचे आधारस्तंभ कै. श्रीपतरावजी शंकररावजी बोंद्रे (दादा) यांच्या जन्मशताब्दी वर्षाला २८ डिसेंबर पासून सुरूवात झाली. या वर्षी कै. दादांच्या विचारांचा जागर वेगवेगळ्या पद्धतीने करण्याचा मानस व्यक्त झाला असून त्याचा आराखडाही निश्चित झाला आहे. त्यानुसार कै. दादांचे राजकीय, सामाजिक, सहकार व शैक्षणिक क्षेत्रातील काम लोकांसमोर नव्याने आणण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे याचे भान ठेवावयास हवे. स्वाभाविकपणे या निमित्ताने वर्षभर होत असलेल्या सर्व कार्यक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी होणे हीच खरी आदारणीय कै. दादांना आदराजंली ठरू शकेल.

१९७१ साली स्थापन झालेले आपले श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय या वर्षी ५० व्या वर्षात पदार्पण करीत आहे. हा पन्नास वर्षांचा प्रवास अनेकांच्या योगदानाने समृद्ध बनला आहे. सुरूवातीला कला, वाणिज्य शाखेमध्ये दिडशे विद्यार्थी होते. आज या दोन शाखांबरोबर विज्ञान विभागासह बी.सी.ए., एम.कॉम. या शाखेतंर्गत सुमारे ४००० हून अधिक विद्यार्थी शिकत आहेत. महाविद्यालयाने या काळामध्ये विविध उपक्रमांची सुरूवात केली, नावलौकिक प्राप्त केला आणि कोल्हापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात आपली वेगळी ओळख बनविली. या सर्व गोष्टींचा धांडोळा या वर्षी विविध कार्यक्रम व उपक्रमांच्या माध्यमातून घेणे अपेक्षित आहे. विद्यार्थीभिमुख शिक्षण प्रक्रिया राबविताना नव्या शैक्षणिक बदलांना आपलेसे करून विद्यार्थी ज्ञान व कौशल्य या दोन्ही स्तरावर यशस्वी व्हावा या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न असणार आहेत.

मित्रहो! आपल्या सर्वांच्या सहकार्याने गेल्या दोन वर्षात आपल्या महाविद्यालयीन स्तरावर विविधांगी बदल दिसत आहे. विशेषत: ११ वी पासून एम.कॉम. पर्यंत विद्यार्थी अध्ययन प्रक्रियेत मनापासून सहभागी होत आहेत. कनिष्ठ विभागाने 'स्कॉलर बॅच' ही संकल्पना परिणामकारकपणे राबविताना परीक्षा पद्धती, समुपदेशन, मार्गदर्शन, पालक संवाद अशा स्तरावर नवनवीन प्रयोग केले ही समाधानाची गोष्ट आहे. वरिष्ठ महाविद्यालयामध्ये ॲकेडेमिक कॅलेंडर, शहाजी वार्ता, आओ भाषा सिखें, इंग्रजी गॅलरी, ॲकेडेमिक डायरी, मूल्यांकनासाठीच्या वह्या, विविध विषयांचे कॉर्नर्स, स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन केंद्र, एन.एस.एस.-एन.सी.सी.ची प्रयोगशील भूमिका, विद्यापीठाचे दहाहून अधिक कोर्सेस, मुलींच्या सबलीकरणाची प्रक्रिया, क्रीडाक्षेत्रातील घवघवीत यश, स्वच्छता व व्यसनमुक्ती अभियानातील सहभाग अशा अनेक गोष्टी मनाचा हुरूप वाढविणाऱ्या आहेत. बी.एस्सी., बी.सी.ए., एम.कॉम. विभागाने गंभीरपणे नवे प्रयोग सुरू केले आहेत. ही सर्व शिदोरी पुढील काळातील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा देणारी ठरेल. याबरोबरच आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे. आपल्यातील सहकारी प्राध्यापकांनी याही वर्षी विद्यार्थ्यांसाठी भरघोस पारितोषिके जाहीर केली. त्यांचे योगदान महाविद्यालयाच्या गुणवत्तेसह नैतिक बांधिलकीची जाणीव करून देणारे आहे.

मित्रहो ! यश अनेकांच्या पाठबळ व सहकार्याने शक्य असते. आपल्या संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे व मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे यांनी आमच्या नवनवीन विचारांना नेहमीच साथ दिली. नव्या विचारातील नाविन्य समजून घेऊन त्याला पाठिंबा दिला. ही बाब माझ्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. त्याचबरोबर महाविद्यालयातील माझे सर्व प्राध्यापक व प्रशासकीय सहकारी यांच्या सक्रिय सहभागाशिवाय हा टप्पा समाधानकारकरित्या पार झाला नसता याची मला जाणीव आहे. पुढील काळात आपल्या सर्वांच्याकडून अशाच सहकार्याची अपेक्षा व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. – प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण



## स्व. श्रीपतरावजी शंकररावजी बोंद्रे (दादा)
यांना
## विनम्र अभिवादन !
(जन्मशताब्दी वर्ष दि. २८ डिसेंबर २०१९ ते २८ डिसेंबर २०२०)

# राजकारणातले संत : स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा)

**जन्मशताब्दी वर्षानिमित्त विशेष लेख**

कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासासाठी सतत झटलेले, पाच वेळा जनतेतून आमदार झालेले माजी कृषी राज्यमंत्री (स्व.) श्रीपतरावजी बोंद्रे (दादा) यांचे जन्मशताब्दी वर्ष दि. २८ डिसेंबर २०१९ पासून साजरे होत आहे. या निमित्ताने वर्षभर विविध उपक्रम व कार्मक्रम कोल्हापुरात होत असून जन्मशताब्दी वर्षानिमित्त स्व. बोंद्रेदादा यांच्या कार्याचे थोडक्यात स्मरण !

श्रीपतराव बोंद्रे दादांचा जन्म २८ डिसेंबर १९२० रोजी झाला. त्यांचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण कोल्हापुरातील शिवाजी पेठेत झाले. लहानपणापासूनच विविध सामाजिक उपक्रमात त्यांचा सहभाग राहिला. ऐन तारुण्याच्या काळात लोकापयोगी कार्याची मुहूर्तमेढ रोवताना त्यांनी फुलेवाडी परिसरात सहकारी चळवळीचा पहिला प्रयोग यशस्वीपणे राबवला. कोल्हापूरच्या विकसित झालेल्या आजच्या गुळाच्या बाजारपेठेचा पाया त्यांनी घातला. १९४५ साली अर्बन बँकेचे संचालक म्हणून ते निवडून आले. शेतकऱ्यांना हक्काने वर्षभर पाणी मिळावे म्हणून १९४९ साली त्यांनी उपसा सिंचन योजनेला सुरूवात केली. तसेच महात्मा फुले हौसिंग सोसायटीची निर्मिती केली. १९५२ मध्ये कोल्हापूर नगरपरिषदेमध्ये नगरसेवक म्हणून त्यांची निवड झाली. १९६१ मध्ये काँग्रेसचे एकमेव सदस्य असूनही निस्वार्थी, निगर्वी राजकारणी म्हणून त्यांची कोल्हापूर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी निवड झाली. या काळात त्यांनी के.एम.टी. बससेवा सुरू केली. याच वर्षी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक म्हणून त्यांची निवड झाली.

१९६७ साली करवीर मतदार संघातून आमदार म्हणून भरघोस मतांनी ते विजयी झाले. १९७२ साली कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदाच्या कालावधीत त्यांनी शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी मोठ्या प्रमाणात गरजू शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा केला. सावकारीच्या दाढेतून शेतकऱ्यांची सुटका झाली पाहिजे, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांना हक्काचा पत पुरवठा झाला पाहिजे यासाठी त्यांनी सतत पाठपुरावा केला. १९७२ साली करवीर मतदार संघातून आमदार म्हणून जनतेने त्यांना दुसऱ्यांदा निवडून दिले. १९७८ साली सांगरूळ मतदार संघातून निवडून येऊन ते तिसऱ्यांदा आमदार झाले. शरद पवार यांच्या पुलोद मंत्रिमंडळात कृषी राज्यमंत्री म्हणून त्यांनी उत्कृष्ट काम केले. १९८० साली चौथ्यांदा आणि १९९० साली पाचव्यांदा सांगरूळ मतदारसंघातून निवडून येऊन दादा आमदार झाले. महाराष्ट्राच्या विधीमंडळात बोंद्रेदादांनी केलेल्या भाषणांची आणि विचारलेल्या विविध प्रश्नांची ६१ पाने आजही मुंबईच्या विधिमंडळ ग्रंथालयात वाचकांना पहावयास मिळतात.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज, स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे विचार समोर ठेवून कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासात दादांनी मौलिक योगदान दिले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे चालवण्यासाठी श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून बोंद्रेदादांनी शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे.

शेतकऱ्यांच्या मुलांनी केवळ पारंपरिक शिक्षण न घेता व्यावसायिक शिक्षण घेतले पाहिजे म्हणून त्यांनी श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, वेणूताई यशवंतराव चव्हाण होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, श्री शहाजी छ. आय.टी.आय., शाहू इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, साई हायस्कूल, जवाहर हायस्कूल, कंझ्युमर्स स्टोअर्स अशा अनेक संस्थांची, शाखांची उभारणी केली.

कै. दादांनी सामान्य कार्यकर्त्यांसाठी, शेतकऱ्यांच्या विकासासाठी आपले सारे आयुष्य खर्ची घातले. शेवटच्या क्षणापर्यंत ते लोकांसाठी झटत राहिले. त्यांच्या विचारातून शेकडो कार्यकर्ते तयार झाले. त्यांच्या विचाराने भारावलेली अनेक मंडळी तसेच विविध पक्षाचे कार्यकर्ते, विविध शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक, प्राध्यापक व विद्यार्थी आपापल्या परीने स्व. बोंद्रेदादांचा विचार पुढे चालवून सामान्यांसाठी, गोरगरिबांसाठी, बहुजन समाजासाठी झटताना दिसत आहेत. ता. २८ डिसेंबर २०१९ रोजी स्व. बोंद्रे दादांच्या जन्मशताब्दी महोत्सवास सुरूवात झाली असून त्यांनी सांगितलेल्या विचारांवरून, दाखवलेल्या वाटेवरून चालत राहून समाजाचा विकास साधणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरणार आहे.

जन्मशताब्दी महोत्सवानिमित्त स्व. श्रीपतराव बोंद्रेदादांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन व सर्वांच्यावतीने भावपूर्ण आदरांजली !

– डॉ. पी. बी. पाटील, ग्रंथपाल




*** नियोजित उपक्रम व कार्यक्रम ***

(कनिष्ठ व वरिष्ठ विभाग)

| अ.क्र. | उपक्रम व कार्यक्रमाचे नांव | नियोजित तारीख व महिना |
|---|---|---|
| १. | स्वच्छता अभियान (एन.एस.एस., एन.सी.सी. व पर्यावरण विभाग) | दि. २६ व २७ डिसेंबर २०१९ |
| २. | स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) प्रतिमा पूजन | दि. २८/१२/२०१९ |
| ३. | रक्तदान शिबिर (एन.एस.एस., एन.सी.सी. व कनिष्ठ विभाग) | दि. २८/१२/२०१९ |
| ४. | व्यापार मेळावा (कॉमर्स विभाग) | जानेवारी २०२० |
| ५. | आरोग्य शिबिर (एन.एस.एस., एन.सी.सी. व महिला विभाग) | जानेवारी २०२० |
| ६. | विज्ञान दिन (विज्ञान विभाग) | फेब्रुवारी २०२० |
| ७. | वक्तृत्व स्पर्धा व निबंध स्पर्धा (भाषा विभाग) | फेब्रुवारी २०२० |
| ८. | महिला दिन – भित्तीपत्रक (कनिष्ठ व वरिष्ठ महिला विभाग) | मार्च २०२० |
| ९. | राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्र (मानव्य विद्या) | मार्च २०२० |
| १०. | स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा व्याख्यानमाला | मार्च २०२० व सप्टेंबर २०२० |
| ११. | माजी विद्यार्थी मेळावा (माजी विद्यार्थी संघ) | एप्रिल २०२० |
| १२. | शेतकरी मेळावा (मानव्य विद्या) | सप्टेंबर २०२० |
| १३. | स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा (पुण्यतिथी) | व्याख्यानमाला – सप्टेंबर २०२० |
| १४. | शाहू क्लब व्याख्यानमाला | वर्षभर किमान ५ व्याख्याने |
| १५. | स्नेह मेळावा, सांस्कृतिक कार्यक्रम व मनोरंजनात्मक स्पर्धा (सांस्कृतिक विभाग) | दूसऱ्या शैक्षणिक सत्रामध्ये |
| १६. | रोजगार मेळावे (कॉमर्स व बी.सी.ए. विभाग) | वर्षभरामध्ये तीन मेळावे |
| १७. | स्व. श्रीपतराव बोंद्रे दादा गुणवंत शिक्षक-शिक्षकेत्तर पुरस्कार | दि. २८ डिसेंबर २०२० |

## संपादकीय....



'शहाजी वार्ता'चा आठवा अंक विद्यार्थी-पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. सदर अंकामध्ये जुलै ते डिसेंबर या कालावधीमधील महाविद्यालयातील विविध उल्लेखनीय बाबींचा आढावा घेतलेला आहे. सदर कालावधीमध्ये कोल्हापूर जिल्ह्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरस्थितीमुळे महाविद्यालयाचे आर्थिक व शैक्षणिक नुकसान झाले. पूरस्थितीनंतरही महाविद्यालयाने पुन्हा भरारी घेत आपले दैनंदिन कामकाज पूर्वपदावर आणले. पूरपरिस्थितीतून सावरत महाविद्यालयातील विविध विभागांनी उल्लेखनीय उपक्रमांचे आयोजन केले आहे. परंतु त्या सर्व उपक्रमांची नोंद जागेअभावी येथे घेणे शक्य झाले नाही, त्याबद्दल क्षमस्व! एन.एस.एस., एन.सी.सी. विभागाच्यावतीने या कालावधीमध्ये अनेक समाजोपयोगी, पर्यावरणपूरक उपक्रम राबविण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांसाठी महाविद्यालयाने भरीव मदत करत मोलाचा हातभार लावला आहे. निश्चितच ही गोष्ट सामाजिक बांधिलकी जपणारी आहे. महाविद्यालयामध्ये राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती या अंकस्वरूपामध्ये विद्यार्थ्यांपुढे जात आहे. याचा विद्यार्थ्यांना व पालकांना महाविद्यालयामध्ये चालणाऱ्या उपक्रमांसंदर्भात संदेश देण्याच्या दृष्टीकोनातून नक्कीच महत्त्वपूर्ण आहे.

धन्यवाद !

डॉ. सुरेश शिखरे

## ग्राहक कायदा परिसंवादाचे आयोजन



वाणिज्य शाखेच्यावतीने 'ग्राहक जनजागृती अभियान' अंतर्गत 'ग्राहक कायदा' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी श्री. अरुण यादव, राज्य ग्राहक संरक्षण मुंबई, सौ. माधवी शिंदे, शहर पुरवठा अधिकारी, कोल्हापूर व श्री. युवराज कदम, वाचन कट्टा संकल्पक, कोल्हापूर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी श्री. यादव यांनी 'ग्राहक संरक्षण कायदा व तरतूदी' या विषयी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

## भौतिकशास्त्र विभागाची अभ्यास भेट



भौतिकशास्त्र विभागाच्यावतीने न्यू कॉलेज येथे अभ्यास भेटीचे आयोजन केले होते. यामध्ये बी.एस्सी. भाग-२ वर्गातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या अभ्यास भेटीदरम्यान विविध प्रात्यक्षिके व प्रयोगशाळेचा अभ्यास करण्यात आला.

## निधी भोजक हिला विद्यापीठाचे ॲडव्हान्स टॅक्सेशन विषयात मेरिट पारितोषिक प्राप्त



एम.कॉम. विभागातील कु. निधी किर्तीकुमार भोजक हिला मार्च/एप्रिल २०१९ मध्ये झालेल्या विद्यापीठ परीक्षेमध्ये ॲडव्हान्स टॅक्सेशन विषयामधील शिवाजी विद्यापीठातील कै. भूपेश विनोद भाटे स्मृती पारितोषिक रु. ५,००० तसेच कैलासवासी दत्तात्रेय रामचंद्र कुलकर्णी जांभळीकर रु. ५०० चे पारितोषिक जाहीर झाले आहे. संस्थेचे चेअरमन मा. श्री. मानसिंग बोंद्रे, मानद सचिव मा. श्री. विजयराव बोंद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण, विभाग प्रमुख प्रा. संतोष कांबळे, डॉ. एम. ए. शिंदे व विभागातील प्राध्यापकांचे तिला मार्गदर्शन लाभले. याबद्दल महाविद्यालयाच्यावतीने तिचे हार्दिक अभिनंदन !

## महाविद्यालय परिसरातील दृष्टिक्षेपात महापूर




महाविद्यालयाची पूरस्थितीबाबतची स्थिती

कोल्हापूर शहर व जिल्ह्यामध्ये ४ ऑगस्ट २०१९ ते ९ ऑगस्ट २०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे कोल्हापूर जिल्ह्यामध्ये प्रचंड मोठा महापूर येऊन गेला. या महापुरामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळीत झालेले होते. आपल्या महाविद्यालयासही याचा मोठा फटका बसला. महाविद्यालयाचे सुमारे ३०,२५,००० रु. इतके आर्थिक नुकसान झाले. महाविद्यालयाची प्राचार्य केबीन, तळमजल्यावरील वर्गखोल्या, रसायनशास्त्र प्रयोगशाळा, बी.सी.ए. कॉम्प्युटर लॅब, लँग्वेज लॅब, जनरेटर रूम, वीज पुरवठा रूम, प्रशासकीय कार्यालय, जिमखाना रूम, भांडार विभाग इत्यादीचा या नुकसानीमध्ये समावेश होता. आर्थिक नुकसानीबरोबरच महाविद्यालयाचे या काळात शैक्षणिक नुकसानही झाले. साधारण १ महिना दैनंदिन कामकाजामध्ये व्यत्यय येऊन महाविद्यालयीन शैक्षणिक व प्रशासकीय कामकाजावर याचा मोठा परिणाम झाला. पूर कालावधीत झालेल्या नुकसानीनंतर महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, एन.एस.एस., एन.सी.सी. विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन अल्प कालावधीतच महाविद्यालय पूर्वपदावर आणले.

## कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) जन्मशताब्दी वर्षास प्रारंभ

श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन व महाराष्ट्र राज्याचे कृषी राज्यमंत्री कै. श्रीपतराव बोंद्रे (दादा) यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले. या निमित्ताने त्यांच्या जयंतीदिनी दि. २८ डिसेंबर २०१९ पासून महाविद्यालयामध्ये विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन सुरू करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून स्व. दादांच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ प्राध्यापक श्री. निवास कुंभार व सेवक श्री. बाबुराव नलवडे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी श्री. कुंभार यांनी स्व. दादांच्या आठवणीस उजाळा देत त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.




*स्व. श्रीपतराव बोंद्रे (दादा) जयंती कार्यक्रमात मनोगत व्यक्त करताना श्री. निवास कुंभार.*



वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने बी.एस्सी. भाग-२ व ३ मधील विद्यार्थ्यांची अभ्यास भेट 'रंकाळा' व राधानगरी येथील 'उगवाई-देवराई' तसेच 'दाजीपूर अभयारण्य' या ठिकाणी आयोजित केली होती. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या पाण्यातील वनस्पती व जंगली वनस्पती यांची ओळख करून घेतली.

## बी.ए. भाग २-इतिहास विषयाची सुधारित अभ्यासक्रम कार्यशाळा संपन्न



*एक दिवसीय कार्यशाळेचे उद्‌घाटन प्रसंगी भाषण करताना मा. डॉ. नंदा पारेकर, डॉ. अवनीश पाटील, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण व उपस्थित मान्यवर*

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ सप्टेंबर २०१९ रोजी बी. ए. भाग दोन इतिहास (भारताचा इतिहास १७५७-१८५७ पेपर क्र. ४ व स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास १८५८-१९४७ पेपर क्र. ६) विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमाची कार्यशाळा संपन्न झाली.कार्यशाळेचे उद्‌घाटन इतिहास विभाग प्रमुख डॉ. नंदा पारेकर यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के शानेदिवाण हे होते.

कार्यशाळेचे बीजभाषण इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. अवनीश पाटील यांनी केले. सदर कार्यशाळेमध्ये प्रा. संदीप जाधव, (काळे) प्रा. संदीप महाजन, (कराड) डॉ. सुरेश शिखरे, डॉ. अजित जाधव (नागठाणे) डॉ. सुरेश चव्हाण, (गडहिंग्लज) डॉ. विकास यलमार (सातारा) डॉ. संतोष जेठीथोर (कागल) डॉ. मुपीद मुजावर (मिरज) इत्यादींची विविध घटकावर मार्गदर्शनपर व्याख्याने झाली. कार्यशाळेच्या शेवटच्या सत्रामध्ये बी. ए. भाग तीन च्या पुढील वर्षी होणाऱ्या सुधारित अभ्यासक्रमावर चर्चा झाली. या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. कविता गगराणी या होत्या.



राज्यशास्त्र विभागातील माजी विद्यार्थी

**निखिल सुहास राऊत**

(२०१४-१५) हा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेवतीने जून २०१९ मध्ये घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल

**हार्दिक अभिनंदन !**

## व्यक्तिगत सौंदर्य संवर्धन प्रमाणपत्र कोर्स संपन्न



*व्यक्तिगत सौंदर्य संवर्धन प्रमाणपत्र कोर्स सहभागी विद्यार्थीनी*

महाविद्यालयातील स्त्री व्यक्तिमत्त्व विकास समितीच्या माध्यमातून दि. २४ सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०१९ या कालावधीमध्ये *'व्यक्तिगत सौंदर्य संवर्धन प्रमाणपत्र कोर्स'*चे आयोजन करण्यात आले. यामध्ये २१ मुलींनी सहभाग नोंदविला. यावेळी 'आरोग्याचा काळजी कशी घ्यावी' इथपासून मेकअपपर्यंतचे विविध प्रकार इ. विषयी सखोल माहिती देण्यात आली.

## कॉमर्स फोरमचे उद्घाटन



*कॉमर्स फोरम उद्घाटनपर मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील व उपस्थित मान्यवर*

महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाअंतर्गत चालविल्या जाणाऱ्या 'कॉमर्स फोरम'चे उद्घाटन प्राचार्य डॉ. पी. बी. पाटील यांचे हस्ते झाले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. पाटील यांनी 'वाणिज्य क्षेत्रातील करिअरची संधी' या विषयी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध असून त्याला कौशल्याची साथ दिली तर भविष्यात उज्ज्वल संधी आहेत, असे मत व्यक्त केले.

## विज्ञान शाखेतर्फे पालक सभेचे आयोजन



विज्ञान शाखेतील बी.एस्सी. भाग-१ ची विद्यार्थी-पालक-शिक्षक संवाद सभा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये महाविद्यालयाच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. याप्रसंगी काही पालकांनी आपली मनोगते व्यक्त केली.

## निर्भया पथकाद्वारे प्रबोधनपर कार्यक्रम



*निर्भया प्रबोधनपर कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सौ. मेणकर*

स्त्री व्यक्तिमत्त्व विकास समिती व सखी मंच कोल्हापूर यांचे संयुक्त विद्यमाने पोलीस उपनिरीक्षक सौ. अनिता मेणकर यांचे प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी त्यांनी विद्यार्थिनींनी दैनंदिन जीवन जगत असताना कोणत्या प्रकारची खबरदारी घेतली पाहिजे, महिला विषयक कायदे, छेडछाडीबद्दलचे गुन्हे व कायदे या संदर्भात विशेष माहिती दिली. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

## 'Research Methodology & Project Work' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा



*संशोधन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्रा. के. व्ही. मारोळकर*

वाणिज्य विभागाच्या विभागांतर्गत एम.कॉम. च्या विद्यार्थ्यांसाठी **'Research Methodology and Project Work'** या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. के. व्ही. मारोळकर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.



**गणितशास्त्र विभागाच्यावतीने 'Mathematics Wall' ही संकल्पना सुरू करण्यात आली आहे. यामध्ये 'गणितातील भारतीय व जगातील शास्त्रज्ञांची ओळख व त्यांचे गणित विषयातील योगदान' या विषयीची माहिती 'Mathematics Wall' च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना होणार आहे. याचे उद्घाटन प्रा. एस. पी. पाटणकर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर यांचे हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.**



## डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिनानिमित्त विशेष व्याख्यान

महाविद्यालयाच्या 'शाहू क्लब' अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कनिष्ठ विभागातील सहाय्यक शिक्षक श्री. गौतम जाधव यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रस्तुतता" या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानावरून मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सद्यस्थितीत तितकेच महत्त्वपूर्ण आहेत जेवढे त्या काळात त्यांनी व्यक्त केले होते. त्यामुळे त्यांच्या विचारांची आजही समाजाला गरज आहे.

## आविष्कार संशोधन स्पर्धेत विद्यार्थ्यांचा सहभाग

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या आविष्कार संशोधन महोत्सवात महाविद्यालयातील गणितशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाकडून एकूण सात संशोधन प्रकल्प सादर केले. यामध्ये कु. मनिषा निर्मळे, कु. धनश्री पाटील, कु. ऋतुजा खामकर, श्री. सोहम हळदीकर, श्री. शुभम पाटील, कु. स्वाती बजगे, कु. वैष्णवी लोहार, कु. दीपाली पोवार, कु. मीनल चिंगळे, कु. आसावरी मांगलेकर इ. विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. डॉ. अजय नलवडे यांनी समन्वयक म्हणून काम केले.

## हिंदी विभाग में विविध कार्यक्रमोंका आयोजन

❊ महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे और हिंदी विभाग के बीच के हुए समन्वय करार के अंतर्गत हिंदी विभाग में सभा की ओर से आयोजित हिंदी प्रबोध परीक्षा का आयोजन किया गया। इसमें कुल ११ छात्रों ने अपना सहभाग दर्ज किया।

❊ आजीवन अध्ययन एवं विस्तार विभाग शिवाजी विश्वविद्यालय कोल्हापुर एवं हिंदी विभाग के समन्वय में 'हिंदी अनुवाद' अभ्यासक्रम का आयोजन किया गया है। ६ महिने के इस अभ्यासक्रम में कुल ११ छात्र सहभागी हैं।



हिंदी विभाग की ओर से हिंदी सप्ताह का आयोजन किया गया। इसके अंतर्गत महाविद्यालय के हिंदी प्रेमी छात्रों के लिए हिंदी निबंध स्पर्धा एवं हिंदी सुलेखन स्पर्धा का आयोजन किया गया। १४ सितंबर के दिन बी.ए. भाग एक, दो और तीन के छात्रों के सहभाग से बनाई भित्तिपत्रिका 'आराधना' का उद्घाटन किया गया। इस दिन का महत्त्व एवं राजभाषा हिंदी का मूल्य विषद करने के लिए महावीर महाविद्यालय की अध्यापिका प्रा. शशिकला सरगर आमंत्रित थी।

## गांधी विचारांची जगाला गरज : प्राचार्य डॉ. पठाण



इतिहास विभागाच्यावतीने गांधी जयंतीच्या निमित्ताने प्राचार्य डॉ. आय. एच. पठाण यांचे व्याख्यान आयोजित केलेले होते. त्यांनी 'गांधी विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तता व गरज' या अनुषंगाने मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते. त्यांनी 'गांधी विचार' तरूण पिढीपर्यंत पोहचविणे हे भारतातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे, असे प्रतिपादन केले.



हिंदी विभाग की ओर से शिवाजी विश्वविद्यालय में अभ्यास यात्रा का आयोजन किया गया। इसमें छात्रों ने वि. स. खांडेकर संग्रहालय, बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय एवं हिंदी विभाग, शिवाजी विश्वविद्यालय को भेंट दी।

## One Day Awareness Programme on De-Addiction



Shri. Prasad Chadekar & Mr. Rajendra Bagade expressing their valuable thoughts and Principal Dr. R. K. Shanediwan giving pledge about de addiction.

National Institute of Social Defense, Shivaji University, Kolhapur and Shri Shahaji Chhatrapati Mahavidyalaya, Kolhapur jointly organized one day awareness programme on Addiction (You don't need heroin to be a hero). Prof. D. G. Chigalikar was inaugurated this programme & expresses their valuable thoughts about programme title. Principal Dr. R. K. Shanediwan, expressed their thoughts, own experiences in his presidential speech. Our secretary of institution Shri. Vijayrao Bondre (Bapu) was chief attendance on this occasion. In first session of the programme, the senior counselor Shri. Prasad Chadekar delivered their speech with the help of own experiences about addiction. Psychiatric Dr. Nikhil Chougule expressed their practical experience about addicted clients with the help of examples of current teenagers. Mr. Rajendra Bagade and Mr. Raju Bhosale, Member of Alcoholic Anonymous Organization, Kolhapur expressed their own past experiences when they both were addicted and what terrible consequences happened on their families. Dr. H. S. Vanmore and Mr. Deepak Devalapurkar were prime speaker as well as examiner of slogan and poster presentation on de-addiction competition. Principal Dr. R. K. Shanediwan, gave pledge about de addiction to all of participants.

## Seminar on Cyber Security



To let students know about Cyber threats, Cyber Security Issues, Awareness, a seminar was held at BCA department. Cyber Security Expert Mr. Amit Sarje, who also serves as Police Naik, S. P. Office, Kolhapur informed the students about various ethics of cyber security. He told the students about the different modes of cyber crimes, virus attacks, social networking security, password protection, financial frauds and its legal scenario with relevant case laws. As many as 50 students were present in this session. The students were also informed about where to file a complaint about such threats and frauds. On this event, Principal Dr. R. K. Shanediwan, BCA faculty and students were present.

## राष्ट्रीय शेतकरीदिन साजरा



वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने **'राष्ट्रीय शेतकरी दिन'** साजरा करण्यात आला. या प्रसंगी बी.एस्सी.-१ च्या विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रक व चित्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांच्या हस्ते झाले.

## Inaugration of 'Geography Corner'



Department of Geography, Science Wing & Art Wing has organize 'Geography Corner' Wall Paper in the auspicious hand of Dr. D. H. Pawar (Dept. of Geogrophy, Shivaji University, Kolhapur). This inaugation programme preciding under Prin. Dr. R. Shanediwan & Dr. Smita Rane.

## 'Wild Life Week' व 'Diversity of Spider' या विषयातंर्गत व्याख्यानाचे आयोजन



देवचंद कॉलेज, निपाणी येथील प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एल. पी. लांका यांच्या हस्ते **'Wild Life Week'** या विषयावरील भित्तीपत्राकाचे उद्घाटन झाले. डॉ. लांका यांनी **'Diversity of Spider'** या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.



***कै. श्रीपतरावजी बोंद्रेदादा यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दि. २८ डिसेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय कॅडेट कॉर्प यांचेवतीने छत्रपती प्रमिलाराजे रुग्णालय, कोल्हापूर यांचे सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये २ विद्यार्थिनींसह २७ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले.***

## इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे मार्गदर्शन



इ. १२ वी कला व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्ड परीक्षेसंदर्भात मार्गदर्शनपर इंग्रजी विषयासाठी डी.आर.के. कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर येथील श्री. रवी पोर्लेकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. 'परीक्षेपूर्वी व परीक्षेस जाताना घ्यावयाचा काळजी' या विषयावर बोलताना श्री. पोर्लेकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.

## इ. ११ वी पर्यावरण विषयाच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट



'आनंदवन' या श्री. दीपक देवलापूरकर यांच्या 'इकोफ्रेंडली' वास्तूस इ. ११ वी पर्यावरण विषयातंर्गत क्षेत्रभेट दिली. या वेळी प्रा. बृहस्पती शिंदे यांनी विद्यार्थ्यांना 'व्यसनमुक्ती' संदर्भात बहुमोल मार्गदर्शन केले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी 'रेन वॉटर हॉर्वेस्टींग', 'कंपोस्ट खत निर्मिती', 'सेंद्रिय भाजीपाला' याबाबत माहिती जाणून घेतली.

## भूगोल विभागाच्या भित्तीपत्रकाचे उद्‌घाटन



भूगोल विभागाच्यावतीने 'एक दिवस शेतावर' या उपक्रमाच्या फोटो प्रदर्शनाचे उद्घाटन गोवा येथील डॉ. पी. के. रथ यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रा. सुधीर पोवार यांनी **'Importance of Geoinformatics in Geography'** या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी गोवा येथील शासकीय महाविद्यालय खांडोला मार्सेला येथील वीस विद्यार्थ्यांनी भूगोल विभागास अभ्यास भेट दिली.

❋ **अर्थशास्त्र विभागाच्या नियोजन मंडळाचे उद्घाटन** श्री. हेमंत जांभळीकर (सेबी रिसोर्स पर्सन, कोल्हापूर) यांचे हस्ते झाले. याप्रसंगी श्री. जांभळीकर यांनी 'अर्थबोध : प्रगतीचा राजमार्ग' या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण होते.

## Seminar on "Future Career in Networking"

Department of BCA organized a seminar on "Future Careers in Networking" which was delivered by Mr. Ranjit Khapre, Director, Router Space Academy and Mr. Ajaruddin Mulla who work as IT trainer. They guided students about various future opportunities in hardware and networking. On this occasion, Principal Dr. R. K. Shanediwan, BCA faculty and students were present.




### ❋ संपादक मंडळ ❋

- संपादक : प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण
- कार्यकारी संपादक : डॉ. सुरेश शिखरे
- सहसंपादक : डॉ. पी. बी. पाटील
- सदस्य : प्रा. एस. एच. कांबळे, प्रा. पी. बी. पाटील, डॉ. एम. एम. ऐतवडे, प्रा. व्ही. एच. पुंदीकर, श्री. पी. के. पाटील, श्री. आर. जे. भोसले

❋ 'शहाजी बुलेटिन' या त्रैमासिकाचे प्रकाशन श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर येथून करण्यात आले. ❋ 'शहाजी बुलेटिन'या त्रैमासिक अंकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

❋ फक्त खासगी वितरणासाठी. वर्ष : दुसरे, त्रैमासिक अंक ८वा (ऑक्टोबर / नोव्हेंबर / डिसेंबर २०१९) ❋ मुद्रक : प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, कोल्हापूर.